**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१०
E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक:- १४/०१/२०१७

## १२ तासात खुनाचे गुन्हयाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कामगिरी

---

मनमाड पोलीस ठाणे हद्दीत भालुर रोडलगत सटाणे शिवारात नाल्यामध्ये एक ४५ वर्ष वयाचे अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले होते. सदर इसमास कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी अज्ञात कारणावरून त्याचा गळा धारदार शस्त्राने कापुन, चेहरा दगडाने ठेचुन जिवे ठार मारले म्हणुन मनमाड शहर पोलीस ठाणेस I गुरनं ०८/२०१७ भादवि कलम ३०२,२०१ प्रमाणे दि. १३/०१/२०१७ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. अंकुश शिंदे साहेब** यांनी सदर घटनेबाबत तात्काळ दखल घेवुन केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर नवले** व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला. तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेवुन घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली व अनोळखी मयताचे वर्णनावरून त्याची ओळख पटवुन संशयीत आरोपीचा शोध घेणेसाठी पथक मनमाड, मालेगाव, चांदवड, देवळा परिसरात रवाना झाले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर नवले यांनी मनमाड परिसरातील खब-यांमार्फत गुप्तरित्या माहिती मिळविली की, घटनेच्या दिवशी दोन इसम दारूच्या नशेत मनमाड ग्रामीण भागातील क-ही गावच्या रस्त्याने पायी जात असतांना दिसले होते, त्यावरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी क-ही गावात काही दिवसांपुर्वी वडनेर खाकुर्डी, ता. मालेगाव येथील काही इसम शेततळयाचे कामकाजासाठी आले होते बाबत समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे मालेगाव येथील पथकाने वडनेर खाकुर्डी येथुन **संशयीत महेंद्र निंबा सोनवणे, वय २७, रा. वडनेर खाकुर्डी, ता.मालेगाव** यास ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या इसमास विश्वासात घेवुन पोलीसी खाक्या दाखविताच त्याने वरील अनोळखी मयतास जिवे ठार मारले असल्याची कबुली दिली. पोलीस चौकशीत त्याने दि.१२/०१/२०१७ रोजी **मनमाड रेल्वे स्टेशन परिसरातील दारू दुकानावर दारू पित** असतांना, तेथे त्याची ओळख धोडांबे ता. चांदवड येथील दादाजी सोनवणे यांचेशी झाली. दारू पिऊन झालेनंतर ते बस स्टॅण्ड वरून रिक्षाने भालुर चौफुलीवर आले व क-ही गावाकडे पायी जात असतांना दोघेही दारूच्या नशेत असल्याने त्यांचेत शिवीगाळ व बाचाबाची झाली, आरोपी महेंद्र निंबा सोनवणे याने त्याचेकडे असलेले कटरने दादाजी सोनवणे याचे गळयावर वार करून खाली पाडले व तोंडावर दगड टाकुन जिवे ठार मारले असले बाबत कबुली दिली आहे. तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी लागलीच धोडांबे येथे जाऊन दादाजी सोनवणे यांचा शोध सुरू केला, धोडांबे येथे दादाजी सोनवणे यांचे घरी जावुन खात्री केली असता, ते समक्ष हजर असल्याचे समजुन आल्याने सदर गुन्हयातील मयत दुसरा कोणी व्यक्ती असल्याचे तपासात समोर आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किशोर नवले यांनी मयत इसमाचे अंगावरील कपडे, पायातील बुट याबाबत बारकाईने तपास करून मयत हा मिस्तरी कामकाज करत असल्याचे गोपनीय रित्या समजले. त्याप्रमाणे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी धोडांबे, ता.चांदवड येथील कुंभारवाडयातील चव्हाण मिस्तरी यांचे घरी जावुन चौकशी केली असता ते त्यांचे मुलीस विवाहस्थळ बघण्यासाठी मुंबई येथे गेले असल्याची माहिती मिळाली. घरातील व्यक्तींना सदर मयत इसमाचा फोटो दाखविताच त्यांनी मयतास ओळखले असुन मयत हा **भाउसाहेब दशरथ चव्हाण, वय ४५, रा. धोडांबे, ता. चांदवड** असे असल्याचे समजले त्यांचेबाबत चौकशी करता ते दि. १२/०१/२०१७ रोजी मुंबई येथुन त्यांचे मुलीस स्थळ बघुन रेल्वेने मनमाड रेल्वे स्टेशन येथे आले होते बाबत तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर खुनाचे गुन्हयातील आरोपी महेंद्र निंबा सोनवणे यास अधिक विचारपुस करता त्याने मयत याचे खिशात असलेले पैसे पाहुन त्यास दारू पाजुन अज्ञात ठिकाणी घेवुन जावुन जिवे ठार मारले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

वरील खुनाचे गुन्हयातील अनोळखी मयत व अज्ञात आरोपींबाबत कोणताही सुगावा नसतांनाही स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर नवले व त्यांचे पथकातील पोउनि श्री. बालाजी मुसळे, पोउनि भरत चौधरी, सपोउनि अरूण पगारे, पोहवा सतिष जाधव, किरण मोरे, विकास शिरोळे, सुहास छत्रे, सुनिल आहिरे, राजु मोरे, पो.ना. भरत कांदळकर, राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ गणेश नरोटे, किरण काकड, रतिलाल वाघ, हेमंत गिलबिले, विश्वनाथ काकड, प्रदिप बहिरम, योगेश गुमलाडू अशांचे पथकाने विविध ठिकाणी जावुन शोध घेवुन सदर गुन्हयातील मयत व आरोपीचे नाव निष्पन्न करून गुन्हा उघडकीस आणलेला आहे.